Vol 6 Issue 6 March 2017

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Welcome to Review Of Research

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2249-894X

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# पोखरण अणु चाचणी (1974) संदर्भात जागतिक दृष्टिकोन व भुमिका

*प्रा. जितेंद्र आनंदा माळी*
*सहा. प्राध्यापक, कै. न्हानाभाऊ म.तु.पाटील कला महाविद्यालय,मारवड. ता.अमळनेर. जि.जळगांव.*

### प्रस्तावना –

दुसऱ्या महायुध्दाचा शेवट करण्यासाठी अमेरिकेने १९४५ मध्ये जपानच्या हिरोशिमा (६ ऑगष्ट) व नागासाकी (९ ऑगष्ट) या दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकून त्यांना पूर्णतः उध्वस्त केले. या अणुबॉम्बच्या स्फोटामुळे अणुंच्या महाभयंकर परिणामांची जगाला जाणीव झाली. त्यामुळे अशी प्रचंड शक्ती आपल्याकडे ही असावी या हेतूने जगातील प्रमुख राष्ट्रे प्रयत्न करू लागली. त्यातून जगात अणुयुगाला व अण्वस्त्र स्पर्धेला सुरूवात झाली. त्या अनुशंगाने आशिया खंडात अण्वस्त्रांच्या विकासाला १९६० च्या दशकापासुन सुरूवात झाली. त्यात १९६४ मध्ये चीनने अणुचाचणी घेवून अण्वस्त्र विकासाला सुरूवात केली. याच काळात पाकिस्ताननेही अणुबॉम्ब बनविण्याची महत्वाकांक्षा बोलून दाखविली आणि ती पूर्ण करण्यासाठी योजना आखायला सुरूवात केली. अशा प्रसंगी स्वसंरक्षणासाठी शांततेचे धोरण सोडून अणुचाचणी घेण्याचे संकेत पंतप्रधान लालबहाद्दुर शास्त्रींनी दिलेत.(Dutta,2005,20) त्यानंतर १९७० च्या दशकात दक्षिण आशियातील शांतता मोठया प्रमाणात भंग झाली, तसेच १९७१ मध्ये पाकिस्तानच्या आक्रमणामुळे भारताची सुरक्षा धोक्यात आली. त्यामुळे सतत बिघडत चाललेली शांतता आबाधित ठेवण्यासाठी व आपल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या संरक्षणासाठी भारताने १८ मे १९७४ रोजी राजस्थानातील पोखरणच्या वाळवंटात पहिली अणुचाचणी घेतली. त्यानंतर जागतिक पातळीवर भारताची अणुचाचणी व अण्विक धोरणावर चर्चा होऊन भारतविरोधी तिव्र प्रतिक्रीया व्यक्त करीत, प्रत्येक राष्ट्राने भारतासंदर्भात वेगळी भुमिका स्विकारलेली दिसून येते. त्याचा परिणाम भारतीय अण्विक संशोधनावर कितपत झाला, तसेच भारताला या अणुचाचणीमुळे विविध अडचणींना सामोरे जावे लागले, त्याचा परिणाम भारतीय अण्विक धोरणावर कितपत झाला. त्यांचा थोडक्यात आढावा प्रस्तृत संशोधन लेखात मांडण्यात आला आहे. सदर संशोधन कार्यासाठी व्यष्टी अध्ययन केंद्रातर्गत ऐतिहासिक व वर्णनात्मक पध्दतींचा वापर करण्यात आलेला असून, यात प्रामुख्याने प्राथमिक मुळ संशोधन ग्रथांचा संशोधन शिर्षकानुसार अन्वयार्थ (Interpetation) लावण्यात आलेला आहे. त्यासाठी काही दुय्यम संशोधन साधनांचाही वापर करण्यात आलेला आहे.



### भारताचा अण्विक कार्यक्रम –

भारताचा अणुसंशोधन कार्यक्रम स्वातंत्र्यानंतर लगेचच सुरू करण्यात आला. शांततामय मार्गाने विधायक कार्यासाठी अणुचा वापर करण्याचे उद्दिष्ठ समोर ठेवून १० ऑगस्ट १९४८ रोजी डॉ. होमी भाभा यांच्या अध्यक्षतेखाली "भारतीय अणुउर्जा आयोगाची" स्थापना करण्यात आली. (Loksabha,1948 ,P.3326-38) या आयोगाने भारतीय अण्विक धोरण – १. अणुबॉम्बची निर्मीती न करण्याचा निर्णय व निःशस्त्रीकरणाला पूर्ण पाठींबा. २. अणुशक्तीचा उपयोग शांततेसाठी व आर्थिक विकास करण्याच्या हेतूने अणुसंशोधन करीत राहणे. या दोन पातळयांवर आखले होते. त्यानुसार भारतीय अण्विक कार्यक्रमाचे नियोजन पुढील प्रमाणे केले गेले. (पाटील,१९९८,४०८) १) अण्विक तंत्रज्ञान हस्तगत करणे. २) अणुभट्टयांची रचना करून त्या कार्यरत करणे. ३) भारतीय शास्त्रज्ञ व तंत्रज्ञांना प्रशिक्षित करणे. ४) भारतात उपलब्ध थोरियम २३३ वर प्रक्रिया करणे. ५) युरेनियम २३५ पासुन नैसर्गिक युरेनियम तयार करणे. ६) अणुइंधनाची भारतात उपलब्धता करणे. वगैरे. त्यानुसार, आंतरराष्ट्रीय स्तरावर अणुचा शांततापूर्ण कार्यासाठी उपयोग करण्याचे धोरण यशस्वी करण्याचा भारताने पुरेपुर प्रयत्न केला. परंतु जगात सुरु असलेल्या अण्वस्त्र स्पर्धेला पाहुन डॉ. भाभांना विश्वास झाला की, अण्विक निःशस्त्रीकरण अशक्य आहे. शेवटी १९५३ मध्ये जिनेव्हा येथील आंतरराष्ट्रीय संम्मेलनात राष्ट्रांच्या औद्योगिक व तांत्रिक विकासात अणुशक्तीचा प्रयोग सहाय्यक सिध्द होवू शकतो हे त्यांनी मांडले. (पाण्डेय,१९९८,९६) पुढे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर यांनी १९५४ मध्ये जाहीर केलेल्या "शांततेसाठी अणू" (Atom for Peace) या नवीन धोरणाचा भारताला फायदा झाला. या धोरणाच्या आधारे अमेरिकेने अणुतंत्रज्ञानाच्या प्रसारावर असलेली गुप्ततेची पकड बऱ्याच प्रमाणात काढून घेतली, त्यामुळे असंख्य भारतीय शास्त्रज्ञ अमेरिकेत जावून अणुतंत्रज्ञानाचा अभ्यास करू लागले. त्यातुनच भारताने १९५६ मध्ये कॅनडा व अमेरिकेच्या मदतीने भारतात सायरस हा अणु संशोधन प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पाचा उपयोग शांततामय विकासकार्यासाठी केला जाईल, असे आश्वासन व करार भारताने उपरोक्त राष्ट्रांबरोबर केला होता. (तोडकर,२०१०,१४१) परिणामी १९५८ मध्ये भारत अणुस्फोट घडवू शकतो इथवर तांत्रिक प्रगती झाली होती. परंतु भारताने अण्वस्त्रे न बनविता, शांततामय विकासासाठी आपला अण्विक कार्यक्रम सुरूच ठेवला होता. साधारणतः १९५० ते १९७० याकाळात भारताने ७५० कोटी रुपये अण्विक कार्यक्रमावर खर्च केले होते. यावरुन अणुशक्तीचा शांततापूर्ण कार्यासाठी उपयोगावर आपले लक्ष केंद्रीत करुन त्यानुसार भारताने आपले अण्विक धोरण

निश्चित केले होते. परंतु १९६० च्या दशकानंतर बदलती आंतरराष्ट्रीय परिस्थिती व घडामोडी लक्षात घेवून भारताचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व आबाधित राखण्याकरीता भारताने मे १९७४ मध्ये पोखरण येथे अणुचाचणी घेण्याचा निर्णय घेतलेला दिसून येतो.

### *पोखरण अणु चाचणी (1974) –*

भारतीय अणुउर्जा आयोगाच्या ट्रॉम्बे व अन्य केंद्रातील यशस्वी संशोधनांमुळे भारताने १८ मे १९७४ रोजी राजस्थानातील जैसलमेर जिल्ह्याच्या पोखरण तालुक्यातील वाळवंटामध्ये लुहारका गावाजवळ खेतोलाई या ठिकाणी पहिली भुमिगत अणुचाचणी घेतली. (फडीया,२००६,३१५) हे ठिकाण भारत-पाकिस्तान सिमेपासून सुमारे १५० कि.मी. आत राजस्थान मधील जोधपुर आणि जैसलमेर शहरांच्या मध्ये आहे. भारताने १८ मे १९७४ रोजी सकाळी ८.१५ वा. येथेच भुमिगत अणुचाचणी घेतली. या अणुचाचणी नंतर भारताने जगातील अण्वस्त्रधारी राष्ट्रांचा एकाधिकार नष्ट करुन अणुशक्तीधारी सहावे राष्ट्र बनले. या अणुचाचणी संदर्भात पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी लोकसभेत स्पष्ट केले कीए ष्ही चाचणी म्हणजे, तांत्रिक व वैज्ञानिक संशोधनाचा एक भाग आहे. ज्याचे संशोधन अण्विक उर्जा विभाग गेल्या २० वर्षांपासून करीत आहे. तसेच भारतात अण्विक अस्त्रे बनविली जाणार नाहीत."(Loksabha,1974,P.266) त्यामुळे अणुचाचणी घेतल्यानंतरही भारताचे अण्विक धोरण हे पूर्वीच्याच शांततामय वापराच्या आराखड्यात बसविले होते. मात्र भारताच्या या कृत्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र प्रतिक्रीया व्यक्त झालेल्या दिसून येतात.

### *1974 मध्ये भारताने अणूचाचणी घेण्यामागील कारणे –*

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने "शांततेसाठी अणू" हे धोरण कायम ठेवून, अण्विक अस्त्रे बनविणार नाहीत. असे ऐच्छिक बंधन स्वतःवर लादले होते.(निकुंभ, २०१०,९०) परंतु भारताला पुढील काही कारणांमुळे अणूचाचणी घ्यावी लागली.

१. आशिया खंडात याकाळात काही महत्वाचे बदल झालेत. त्यात पाकिस्तान व चीन यांचे जवळचे संबंध निर्माण झालेत.

२. १९७० च्या दशकात दक्षिण आशियातील सत्ता समतोल बदलला. भारताला एकटे पाडण्याच्या हेतूने पाकिस्तानने पुढाकार घेवून पाकिस्तान-चीन-अमेरिका अशी सामाईक युती घडवून आणली.

३. १९६५ च्या भारत पाकिस्तान युध्दानंतर सोव्हिएत रशिया - भारत यांच्यात २० वर्षीय मैत्री करार घडून आला.

४. १९७१ च्या बांगलादेश युध्दाच्या वेळेस निक्सन प्रशासनाने पाकिस्तानला मदत करण्याच्या उद्देशाने बंगालच्या खाडीत अणुशक्तीवर चालणारी विमानवाहू युध्दनौका एन्टरप्राईज पाठविली होती. त्याच्या विरुध्द किंवा त्याच्या तुल्यबळ प्रतिकार क्षमता भारताजवळ नसल्यामुळे, सुरक्षाविषयक समस्या वाढली होती.

५. हिंदी महासागरात महाशक्तींच्या नाविक दलांची वाढलेली उपस्थिती व त्यांच्या अण्विक अस्त्रांची संख्या आणि मारक क्षमता भारताच्या दक्षिणेस वाढविल्यामुळे भारताच्या सागरी सुरक्षेस मोठा धोका निर्माण झाला होता.(Sing Jasjit,1997,14)

६. भारताचे शेजारील चीन हे राष्ट्र अण्वस्त्र क्षमता असलेले राष्ट्र होते, तर शेजारी राष्ट्र पाकिस्तानचे अणु तंत्रज्ञान प्राप्तीसाठी प्रयत्न सुरु होते. त्यातच चीन-पाकिस्तानचे सामरिक संबंध तसेच भारताबरोबरचे त्यांचे भूतकालीन व वर्तमानकालीन द्विपक्षीय संबंध या सर्वांचा विचार करुन भारताला आपल्या अण्विक पर्यायावर गांर्भीयाने विचार करण्यास भाग पाडले.

७. पाकिस्तानचे लष्करी हुकूमशहा जनरल भुत्तोंनी बांगलादेश संघर्षानंतर लगेच १९७२ मध्ये आपल्या वैज्ञानिकांची मुलतान येथे एक गुप्त बैठक घेतली. त्यात पाकिस्तानला लवकरात लवकर अण्वस्त्र सज्ज करण्याचा संकल्प केला गेला.(Chari,1996,44)

८. अमेरिकेने पाकिस्तानच्या अण्वस्त्र निर्माण करण्याच्या प्रयत्नांकडे जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष.(Kumar Jaswinder,1989,113)

९. सन १९६२ चे चीनचे आक्रमण, १९६४ साली चीनने केलेली पहिली अणुचाचणी, त्यामुळे बदललेली परिस्थिती व प्रभावित झालेली भारताची सुरक्षा, एकीकडे पाकिस्तान आणि दुसरीकडे चीनचा वाढता प्रभाव, चीन भारत सीमावाद, भारतीय सीमेतील अरुणाचल प्रदेश हा चीनचा असल्याचा चीनने केलेला दावा, तर सिक्कीमला स्वतंत्र देश जाहीर करणे या सर्व घटना भारताला असहाय्य होत होत्या. (निकुंभ,२०१०,१०३)

१०. भारत-रशिया यांच्यात परस्पर सहकार्य करार ऑगस्ट १९७१ मध्ये झाला, या करारानुसार सो. रशियाने भारताला दक्षिण आशियाई धोरणांतर्गत सहकार्य करण्याचे निश्चित केले. त्यामुळे सो. रशियाचे मानसशास्त्रीय सहकार्य लाभल्याने भारताला पाठबळ मिळाले. (Alam,1988,28)

उपरोक्त विविध कारणांमुळे भारताने १८ मे १९७४ रोजी पोखरण येथे अणू चाचणी घेतलेली दिसून येते.

### *जागतिक दृष्टीकोन व भुमिका –*

भारताच्या अण्विक चाचणीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अण्वस्त्र प्रसार बंदी कडे सर्व राष्ट्रांचे लक्ष वेधले गेले. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताविषयी तिव्र प्रतिक्रीया व्यक्त करीत, प्रत्येक राष्ट्राने भारतासंदर्भात वेगळी भुमिका स्विकारलेली दिसून येते. त्यांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे मांडता येतो.

*कॅनडा –* भारताने घेतलेल्या अण्विक चाचणीचा सर्वात मोठा धक्का कॅनडाला बसला. कारण, या अणुस्फोटात वापरण्यात आलेले प्लुटोनियम व अन्य सामुग्री कॅनडा सरकारने भारताला "शांततेसाठी अणू" या धोरणानुसार सायरस रियेक्टर अणुभट्टीसाठी पुरविलेली होती. भारताने प्रगती व विकास कार्यासाठी त्यांचा वापर करण्याच्या अटींवर ते प्राप्त केले होते. त्यामुळे या अण्विक चाचणीनंतर चारच दिवसांत कॅनडाने भारताच्या राजस्थान-१ व कोटा-जडपाणी प्रकल्प, या दोन अणुभट्ट्यांना देण्यात येणारी सर्व प्रकारची अण्विक मदत बंद केली. तसेच कॅनडाचा भारताविषयीच्या दृष्टिकोनात बदल होवून कॅनडाने कठोर भुमिका घेतली. कॅनडाचे पंतप्रधान ट्रडेयू यांनी भारतीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना धमकी दिली की, "जर भारताने कॅनडाकडून प्राप्त केलेल्या अणु इंधनाचा वापर अणुबॉम्ब बनविण्यासाठी केला तर, कॅनडा भारताची अण्विक व आर्थिक सहाय्यता पुर्णपणे बंद करेल." त्याच बरोबर या अणुचाचणीने नाराज झालेल्या कॅनडाने आपल्या सर्व मित्र राष्ट्रांना भारताला अण्विक इंधन आणि तंत्रज्ञान न पुरविण्याबाबत आवाहन केले. त्यामुळे कॅनडा व अन्य अणुशक्तीधारी राष्ट्रांनी भारतासोबत अण्विक असहयोग पत्करला. (दीक्षित,१९९९,३९०)

तसेच कॅनडाने भारतासोबतचे आर्थिक, व्यापारी व तांत्रिक संबंध संपुष्टात आणुन भारतावर कठोर प्रतिबंधांची घोषणा केली. की, जोपर्यंत भारत आपल्या सर्व अण्विक केंद्रांना आंतरराष्ट्रीय निरीक्षण व नियंत्रणासाठी खुले करणार नाही, तोपर्यंत कॅनडा सरकार भारताला

कोणत्याही प्रकारे अण्विक इंधन व तंत्रवैज्ञानिक मदत पुरविणार नाही. (दुबे,२००७,८७)

*चीन* – भारतीय अण्विक चाचणीने चीनला गंभीर स्वरुपाचा धक्का बसला. त्यामुळे चीनने कठोर शब्दात या अणुचाचणी विरोधी प्रतिक्रीया जाहीर करीत भारतावर आरोप केला की, “भारताच्या या अण्विक चाचणीमुळे दक्षिण आशियाची शांतता भंग पावली असून भारत दक्षिण आशियाई राष्ट्रांना भीती दाखवून या क्षेत्रात आपले वर्चस्व निर्माण करु इच्छित आहे.” त्याच बरोबर चीनने भारताचा पारंपरिक शत्रू असलेल्या पाकिस्तानला लष्करी आणि तांत्रिक सहाय्य पुरविणे सुरू केले. (रत्तु,१९९९,७०)

*ऑस्ट्रेलिया* – भारतीय अणुचाचणी बाबत ऑस्ट्रेलियाने भारत विरोधी भुमिका घेवून, भविष्यात भारताला कोणत्याही प्रकारची अण्विक सामुग्री व इंधन पुरविण्यास नकार दिला. तसेच भारतावर अन्य देशांनी लावलेले आर्थिक व तांत्रिक प्रतिबंधांचे समर्थन केले. तसेच भविष्यात भारत अणुचाचणी घेवू शकणार नाही. यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याची सूचना ही ऑस्ट्रेलियाने अणु पुरवठादार गटातील राष्ट्रांना केली. त्यासाठी भारतावर कठोर अण्विक प्रतिबंध लावण्याचे समर्थन केले. (गजराज,२०१४,७६)

*पाकिस्तान* – १९७१ च्या भारताबरोबरच्या युध्दात पराभव स्विकारावा लागलेला असल्यामुळे भारत पाकिस्तान संबंध अधिक चिघळलेले होते. पाकिस्तानी नेते भारत विरोधी पावित्र्यात होते. अशावेळी भारताने यशस्वी अण्विक चाचणी घेतल्याने पाकिस्तानी नेतृत्व अत्यंत त्वेशाने पेटून उठले, आणि पराभुत मानसिकतेतून चिडून पाकिस्तानी पंतप्रधान झुल्फिखार अली भुट्टो यांनी घोषणा केली की, “प्रसंगी आम्ही गवत खाऊन दिवस काढू, परंतु अणुबॉम्ब निश्चित बनवू.” (रत्तु,१९९९,२०१) त्याच बरोबर अणु शास्त्रज्ञांची त्वरीत बैठक बोलावून येन-केन-प्रकारेन अणुबॉम्ब निर्माण करण्याचा आदेश दिला. तसेच आपले मित्र राष्ट्र अमेरिका व अन्य राष्ट्रांकडे भारतावर विविध बंधने घालण्याचे साकडे घातले. तर भारतावर आरोप केला की, “भारत दक्षिण आशियाई प्रदेशात अण्विक दडपशाही निर्माण करुन या क्षेत्रातील शांतता भंग करीत आहे.” त्यामुळे भारतावर बंधने घालणे योग्य आहे.

*जपान* – अणुबॉम्बचे विघातक परिणाम सहन केलेल्या जपानने भारताच्या अण्विक चाचणी विषयी तिव्र नाराजी व्यक्त केली. तसेच भारताला अलिप्ततावादी, शांततामय सहअस्तित्व व अहिंसा (Non-Alignment, Peaceful Co-existents and Non-Violence) या तत्वांची जाणीव करुन दिली. भारतावर विविध प्रकारचे अर्थिक प्रतिबंध घालण्याची घोषणा करीत, जागतिक बँक (World Bank) व आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष, (IMF) विश्व सहाय्यता कोष (WDF) अशा आर्थिक संस्थांमध्ये भारत विरोधी भुमिका घेत दबाव टाकला. (गौतम,१९८०,८७) एकंदरीत जपानने भारताचा अण्विक कार्यक्रम बंद पाडण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर जनमत गोळा केलेले दिसून येते.

*नार्वे* – नार्वेने भारताच्या अणु चाचणीसंदर्भात तिव्र नाराजी व्यक्त करीत, भारतासोबतचे आपले राजनैतिक संबधं संपुष्टात आणण्यासाठी नार्वेच्या उच्चायुक्ताला भारतातून परत बोलावले. आंतरराष्ट्रीय स्तरावर व जागतिक बॅक यांनी भारताला कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत करु नये, याकरीता भारत विरोधी प्रयत्न सुरु केले. तसेच भारत अण्विक चाचण्या घेवून जागतिक स्तरावर अण्विक स्पर्धा निर्माण करुन विश्व शांततेचा भंग करीत असल्याचा आरोप केला. (गजराज,२०१४,७६)

*न्यूझीलंड* – न्यूझीलंडने भारतासोबतचे आपले राजकीय संबंध संपुष्टात आणले. आपला राजदूत व उच्चायुक्ताला परत बोलावून घेतले. तसेच भारतीय राजदूतासही परत मायदेशी जाण्याचे आदेश दिले. त्याच बरोबर भारताचा आण्विक कार्यक्रम बंद पाडण्यासाठी भारताला जागतिक स्तरावर कोणत्याही प्रकारची तांत्रिक मदत मिळू नये यासाठी प्रयत्न सुरु केले. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांमध्ये भारत विरोधी ठराव मंजुर करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. भारताचा आर्थिक व तांत्रिक विकास रोखण्यासाठी पुरेपुर प्रयत्न केले. (जागरण,१९७४,६)

*फ्रांस* – भारताच्या अणुचाचणी विषयी फ्रान्सने तिव्र प्रतिक्रीया व्यक्त केली. फ्रान्सच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारतविरोधी भुमिका जाहीर करीत भारताला आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांकडून देण्यात येणाऱ्या अर्थिक सवलती व कर्ज बंद करण्यावर भर दिला. तसेच दक्षिण आशियाई क्षेत्रातील राष्ट्रांना संयम बाळगण्याचा सल्ला दिला. (गजराज,२०१४,८२)

*ब्रिटन* – भारताच्या अणुचाचणी संदर्भात ब्रिटनने असहकार्याची भुमिका घेत भारताचा धिक्कार केला. त्याच बरोबर अमेरिकेच्या मदतीने युरोपीयन कम्युनिटीची बैठक बोलावून भारताला अण्विक सहकार्य न करण्याविषयी ठराव मंजुर केला.(दुबे,२००७,८७)

*सोव्हिएत रशिया* – १९४५ ते १९९० या शीतयुध्दाच्या काळात भारताने १९७४ मध्ये अणुचाचणी घेतल्याने जागतिक स्तरातून भारत विरोधी प्रतिक्रीया येत असतांना अमेरिकेचा शत्रू व भारताचा परममित्र सो. रशिया मात्र भारताच्या पाठीशी उभा राहीला. आंतरराष्ट्रीय स्तरावर सो. रशियाने कोणतीही प्रतिक्रीया व्यक्त केली नाही. उलट या चाचणीने भारत दक्षिण आशियाखंडात अण्वस्त्र संपन्न राष्ट्र झाल्याने व भारत रशिया मैत्री मुळे अमेरिकेच्या वाढत्या सामर्थ्यांला आपोआप आळा बसेल अशी आशा व्यक्त केली. तसेच आंतरराष्ट्रीय समुदायाने भारताला सर्व आर्थिक व अण्विक मदती बंद केल्यामुळे भारताच्या बंद पडणाऱ्या सायरस अणुभट्टीला इंधनाचा पुरवठा करुन सो. रशिया भारताच्या पाठीशी उभा राहीलेला दिसून येतो. (Krishan,Hindustan Times,1974.)

*अमेरिका* – भारताच्या या अण्विक चाचणीचा अमेरिकेला मोठा धक्का बसला. कारण, भारताने सन १९५६ मध्ये कॅनडा आणि अमेरिकेच्या मदतीने विधायक कार्यासाठी सायरस हा अणु संशोधन प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा या प्रकल्पासाठी मदत घेतांना हा प्रकल्प केवळ शांततामय कार्यासाठी वापरण्याची हमी भारताने अमेरिका व कॅनडा सरकारला दिली होती. (Jain,1999,29) मात्र भारताने अत्यंत गोपनियरित्या अण्विक कार्यक्रम राबवून अमेरिकला धोका दिला, या कारणावरून अमेरिकेने भारत विरोधी भुमिका घेतली. याबाबत अमेरिकेचे राजदूत डॅनियल पॅट्रिक यांनी, अमेरिकेची अधिकृत प्रतिक्रीया नोंदवितांना म्हटले की, भारताने ही एक मोठी चूक केली आहे, आणि त्यामुळे द. आशियात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच बरोबर भारताने आंतरराष्ट्रीय अण्वस्त्र प्रसार बंदीच्या प्रयत्नांकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याची टिका त्यांनी केली. (Daniel,2000,174) अमेरिकेचे संरक्षण सचिव स्केहले सिंगर यांनी अण्विक युगात अण्विक शस्त्रास्त्रांपासुन भारताचे संरक्षण करण्याची अमेरिकेची वचनबध्दता मागे घेण्याची धमकी दिली. तसेच अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत भारताच्या पोखरण अणू चाचणीवर तिव्र प्रतिक्रीया व्यक्त केली की, भारताने ही चाचणी घेणे म्हणजे नैतिक आणि राजकीय पाप असून, भारताची ही कृती राष्ट्रीय ढोंगीपणा आणि माणुसकीला निष्ठूर धोकादायक स्थिती निर्माण करणारी आहे.

अमेरिकन अणुउर्जा आयोगाने (US-AEC) ७ सप्टेंबर १९७४ रोजी भारताला देण्यात येणारे समृध्द युरेनियम इंधनाची मदत जोपर्यंत नवी दिल्ली वरुन, “अमेरिकेकडून मिळणारे अणु इंधन कोणत्याही अणुस्फोटासाठी वापरले जाणार नाही.” असे हमी पत्र मिळत नाही, तोपर्यंत थांबविण्यात आली. (Facts,1997,84) तसेच भारताला मिळणारी अमेरिकन मदतही स्थिरावली. साहजिकच या अणुचाचणीमुळे भारत अमेरिका संबंधात काही काळापर्यंत तणाव निर्माण होवून, संबंधात वाढ न होता ते मागे गेले. (के.सुब्रम्हण्यम,लोकसत्ता,सप्टें.,२००८)

*सारांश –*

भारताच्या अणुचाचणी नंतर अमेरिका, इंग्लंड, फ्रांन्स, जर्मनी, कॅनडा आणि जपान या राष्ट्रांनी अणुपुरवठादार गटाची स्थापना केली. या गटाने जो पर्यंत भारत अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर सही करणार नाही, तोपर्यंत भारताला अण्वस्त्रांचे तंत्रज्ञान, कच्चा माल, यंत्रसामुग्री इत्यादींच्या पुरवठयावर १९५४ च्या कायद्यानुसार बंदी आणली. (Dutta,2005,212) तसेच तारापुर अणुभट्टीला समृध्द युरेनियम पुरवठयाच्या बदल्यात अन्य अण्विक प्रकल्पांच्या निरीक्षणाची मागणी केली. मात्र भारताने ही मागणी फेटाळून लावली. परिणामी तारपुर अणुभट्टी समृध्द युरेनियम अभावी बंद पडण्याचा धोका निर्माण झाला होता.(अग्रवाल,२००५,१४७) परिणामी याकाळात विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात भारताची मोठया प्रमाणावर कोंडी झाली. तरीही भारताने अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर ;छच्न्द्ध स्वाक्षरी न करता, आपले निःशस्त्रीकरणा संदर्भात कार्य सुरु ठेवून शांततेसाठी अणू हे धोरण कायम टिकवून ठेवले.(अग्रवाल,२००५,१४७) यावरुन भारताचे अणुशक्ती व त्याच्या वापराविषयीचे स्पष्ट धोरण दिसून येते.

*संदर्भ ग्रंथ सूची –*

१. Dutta Meena & Sharma Jai Narayan, Defence Economics, Deep & Deep Publications Pvt. Ltd. New Delhi. 2005.
२. Loksabha Debets, Second Session, Vol.15, April 06, 1948, P. 3326-38
३. पाटील आनंद, स्पर्धा परीक्षा–नोकरी संदर्भ, स्टडी सर्कल पब्लिकेशन्स,मुंबई. अंक–६,जून१९९८.
४. पाण्डेय बाबुराम आणि पाण्डेय रामसुरत, राष्ट्रीय सुरक्षा एवं अन्तराष्ट्रीय सम्बन्ध, प्रकाश बुक डेपो, बरेली. १९९८.
५. तोडकर बी. डी., भारत आणि जग, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. २०१०.
६. फडिया बी. एल., आंतरराष्ट्रीय संबंध, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा. २००६.
७. Loksabha Debates, Fifty Series, Eleventh Session, Vol. XLI July, 22. August 2, 1974.
८. निकुंभ जी. एच., पाकिस्तानच्या अणू धोरणाचा आणि सियाचीन संदर्भात भारताच्या सुरक्षेचा चिकित्सक अभ्यास, (अप्रकाशित शोधप्रबंध), उ.म.विद्यापीठ, जळगांव.
९. Sing Jasjit, India : The Sixth State with Nuclear Weapons, Asian Strategic Review, 1997-98.
१०. Chari P.R.Pervaiz Iqbal Cheema Ifterkharuzz Aman (Ed.) Nuclear Non–Proliferation In India and Pakistan South Asian Perspectives, Manhoar Publishers And Distributors, New Delhi, 1996.
११. Kumar Jaswinder, Irritants in Indo-Pak Relation's, Deep & Deep Publications, New Delhi, (First Education) 1989.
१२. Alam Mohamad B. India's Nuclear Policy, Mittal Publication, Delhi. 1988.
१३. दीक्षित जे. एन., भारतीय विदेश नीती, प्रभात प्रकाशन, दिल्ली. १९९९.
१४. दुबे शालिनी, भारत की परमाणु नीती : पोखरण विस्फोट, आदि पब्लिकेशन्स, नई दिल्ली. २००७.
१५. रत्तु कृष्णकुमार, भारतीय परमाणू परीक्षण और निःशस्त्रीकरण, प्वाइंट पब्लिशर, जयपूर. १९९९.
१६. पद्मसिंह गजराज, भारत की परमाणु नीती औार भारत अमेरिका सम्बन्ध, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली. २०१४.
१७. गौतम बी.डी.एस., प्रतिबन्धों के प्रहार का प्रभाव, माया–नियतकालीक, दिल्ली. १५ जुलाई १९८०.
१८. संपादकीय, दैनिक जागरण, नई दिल्ली. १३ जुलाई १९७४.
१९. Jain J. P., Nucler India: Vol. 2, Rediant Publication, New Delhi. 1999.
२०. Daniel Joseph Kuba and G.V. Vaidyanatha in Kanti Bajpai, Amitabh Matto (eds.) Engaged Democracies - Indo-US Relations in the 21st Century, Har-Anand Publications, New Delhi. 2000.
२१. Facts on File, Vol. 34, No. 1771, October 19, 1997.
२२. के. सुब्रम्हण्यम, भारताला एनएसजी ने सूट देण्याचा अर्थ, लोकसत्ता, मुंबई आवृत्ती, २० सप्टेंबर २००८.
२३. अग्रवाल खण्डनसिंह, युध्द एवं शान्ति का अध्ययन, शारदा पुस्तक भवन, इलाहाबाद,२००५.
२४. Krishan Bhatia, "Annoyance over Nuclear Bliss", The Hindustan Times (New Delhi), June 1, 1974.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org